क्र.जिपउआ/जिकृरेकें/तां/वाहतुक /७६५/२०२६ जळगांव दिनांक 02/06 /२०२६

जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, जळगांव जिल्हा जळगांव कार्यालय.

# जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त
# जळगांव यांचे कार्यालय अंतर्गत.

## जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र, जळगांव
## जिल्हा-जळगांव

या कार्यालयाच्या
दि. १/७/२०२६ ते ३०/६/२०२७ या कालावधीसाठी

द्रवनत्र , द्रवनत्रपात्रे, इ. साहित्य वाहतूकीची दरपत्रक

क्र.जिपउआ/जिकृरेकें/तां/वाहतुक /७६५/२०२६ जळगांव दिनांक ०५/०६ /२०२६

जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, जळगांव जिल्हा जळगांव कार्यालय.

# जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त जळगांव यांचे कार्यालय अंतर्गत.

## जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र, जळगांव
## जिल्हा-जळगांव

या कार्यालयाच्या
दि. १/७/२०२६ ते ३०/६/२०२७ या कालावधीसाठी

द्रवनत्र , द्रवनत्रपात्रे, इ. साहित्य वाहतूकीची दरपत्रक

## जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, जळगांव यांचे कार्यालय अंतर्गत.

## दरपत्रक सुचना

जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, जळगांव हे जळगांव जिल्हयातील पशुवैद्यकीय दवाखान्याना सन २०२६-२७ मध्ये रेतमात्रा व द्रवनत्राची वाहतूक करणेसाठी १५ वर्षाच्या आतील नोंदणीकृत ४०७/ बोलेरो पीकप/ बोलेरो मॅक्स ट्रक/तत्सम वाहनाचे कंत्राटदाराकडून प्रती कि.मी.दराकरीता दि. ३/६/२०२६ ते १२/६/२०२६ या कालावधीसाठी दोन लिफापा पदधतीने दरपत्रक मागविण्यात येत आहे

. दरपत्रकाचे वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे

| अक्र | विवरण | कालावधी |
|---|---|---|
| १ | दरपत्रक कार्यालयात सादर करण्याचा दिनांक व वेळ | दि.३/६/२०२६ सकाळी ११.०० ते १२/६/२०२६ सकाळी ११.०० वाजेपर्यत |
| २ | .दरपत्रक उघडण्याचा दिनांक व वेळ<br>लिफापा १ (तांत्रिक)<br>लिफापा २ ( व्यापारी) शक्य झाल्यास | दि.१५/०६/२०२६<br>सक्ाळी २ वाजता<br>दुपारी २.३० वाजता |
| ३ | | |

.दरपत्रकसबंधी अटी व शर्तीची संपुर्ण माहीती फलकावर कार्यालयीन वेळेत तसेच जिल्हाधिकारी कार्यालय व पशुसंवर्धन खात्याच्या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

**जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय**
**जळगांव**

# जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र, जळगांव
## सन २०२५-२६ करीता द्रवनत्र वाहतुकीबाबत अटी व शर्ती

जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र, जळगांव पासून जळगांव जिल्हयातील पशुवैद्यकीय दवाखान्याना रेतमात्रा व द्रवनत्राची (५० ते ५५ लिटर क्षमतेची अंदाजे ६० किलो वजनाची ४४ द्रवनत्रपात्रे) वाहतूक करणेसाठी वाहतूकदाराकडे **प्रथम नोंदणी १५ वर्षाच्या आतील** असलेले टेम्पो वाहन ४०७/बोलेरो पीकप/बोलेरो मॅक्स ट्रक/तत्सम इ. असणे आवश्यक आहे. जिल्हयातील १८२ संस्थांना द्रवनत्र व रेतमात्रा पुरविण्यासाठी ११ रुटद्वारे सर्वसाधारणपणे ४५०० कि.मी. याप्रमाणे वर्षात अंदाजे ३७००० कि.मी. वाहतूक करावी लागते. या व्यतिरिक्त द्रवनत्र खरेदीच्या होणा-या भावबंध करारानुसार द्रवनत्र आणणेसाठी नाशिक अथवा महाराष्ट्राच्या बाहेरील ठिकाणी आवशक्यतेनुसार जावे लागेल. यासाठी सर्व अटी व शर्तींच्या अधीन राहून वाहनाचे कंत्राटदाराकडून दि.१/७/२०२६ ते ३०/६/२०२७ किवा पुढील निविदा सन.२०२७-२८ ची प्रक्रीया होईपर्यत दरपत्रक मागवित आहेत. सदर वाहतूक जिल्हाअंतर्गत किंवा जिल्हयाबाहेर करावी लागेल.

१) निविदा दोन लिफापा पदधतीने सादर करणे आवश्यक आहे.

**नं.१-तांत्रिक लिफाफयातील सहप्रपत्रे-**

१. निविदेच्या अटी व शर्ती मान्य असल्याचे स्वाक्षरी करुन सदर प्रपत्र भरावेत.

४. वाहनासंबंधिची कागदपत्रे- वाहनाचे रजिस्ट्रेशन बुक **(प्रथम नोंदणी १५ वर्षाच्या आतील आवश्यक)** व टॅक्स बुक, पॅन कांर्ड, आधार कार्ड माल वाहतुकीचा परवाना, वाहनाचा विमा, पासिंग वर्ष व मुदतीबाबतचा तपशील. समंतीपत्र, वाहनचालकाचे ड्रायव्हिंग लायसन्स वरिल सर्व कागदपत्रे तांत्रिक लिफाफयामध्ये अपलोड केले जातील.

**नं.२- व्यापारी प्रपत्र-**

(१) दरपत्रक- वाहनाचा प्रति कि.मी. दर अक्षरी व अंकी नमूद करावा.

२) **निविदा धारकांनी निविदा रजिस्टर पोस्ट/स्पिड पोस्ट/कुरीयर द्वारे पाठविल्यास निविदा स्विकारल्या जाणार नाहीत अथवा त्या ग्राहय धरल्या जाणार नाहीत.**

३) जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र, जळगांव, पासून जळगांव जिल्हयातील पशुवैद्यकीय दवाखान्यांना वाहतूक करावी लागते. (सोबत केंद्रनिहाय ११ रुटचा तक्ता दिला आहे.) या व्यतिरिक्त द्रवनत्र खरेदीच्या होणा-या भावबंध करारानुसार द्रवनत्र आणणेसाठी नाशिक अथवा महाराष्ट्रा बाहेरील ठिकाणी दरमहा साधारणतः दोन ते तीन वेळा जावे लागेल. मुक्कामासाठी वेगळा आकार दिला जाणार

नाही. वाहनचालका शिवाय वाहनासोबत एक मदतनीस ठेवणे व त्याने साधारणत: ६० किलो वजनाच्या द्रवनत्रपात्रांची वाहनातून चढउतार करणे व वाहनापासून केंद्राच्या ठिकाणी पात्रांची ने-आण करणेचे काम करणे आवश्यक आहे. मदतनीसाठी वेगळा आकार दिला जाणार नाही. तसेच इंधनाची दरवाढ झाली तरी दरात वाढ मिळणार नाही.

४) वाहातुकीचे वाहनामध्ये कॉयरमॅटीग अथवा नरम आच्छादनाचा वापर करणे आवश्यक आहे.

५) द्रवनत्र पात्राचे नुकसान व तुटफूट होणार नाही तसेच वाहन हुड असलेले असावे ज्यामूळे,उन,वारा, पाऊस यापासून द्रवनत्रपात्रांना संरक्षण मिळेल.

६) द्रवनत्र वायू हा अतिथंड अवस्थेत (-१९६ डिग्री सेल्शीअस) असतो. त्यामूळे वातावरणाशी संबंध येताना त्यातून जी वाफ निघते ती अति थंड असते याची माहिती ठेकेदाराने पुर्णपणे करुन घ्यावी.द्रवनत्र वायू एका पात्रातून दूस-या पात्रात टाकताना सावधपणे टाकावा तो निष्काळजीने वाया गेल्याचे आढळून आल्यास त्याची भरपाई ठेकेदाराने करुन द्यावी लागेल.

७) वाहतुक कंद्राटदाराने ज्या गाडीने वाहतुक करणार आहे ते वाहन त्याच्या मालकीचे असावे.

८) वाहन उपलब्ध करुन देण्याबाबत ठेकेदारास सर्वसाधारणत: २४ तासापूर्वी सुचना देण्यात येईल. तसेच द्रवनत्र टॅकर आल्यानंतर वाहन मालकाला द्रवनत्र टॅकर खाली करणेसाठी मदतनीस दयावे लागतील.

९) **प्रत्येक वाहातुकीच्या वेळी द्रवनत्रपात्रे वाहन चालकाच्या ताब्यात देण्यात येतील म्हणून त्याची जबाबदारी वाहनाचे मालकावर निश्चित राहील .वहातुकीचे वेळी मालकाने किंवा त्याचे व्यक्तींनेही पात्रे हाताळताना निष्काळजीपणा झाल्यास व द्रवनत्रपात्राची तुटफूट होऊन, नुकसान झाल्यास त्याची किंमत ठेकेदाराकडून वसूल करण्यात येईल.**

१०) द्रवनत्राची वाहतुक करताना त्या गाडीमध्ये एक सहाय्यक पशुधन विकास अधिकारी किंवा एक परिचर याप्रमाणे दोन प्रतिनिधी गाडीसोबत राहतील, अशा प्रकारचा परवाना असणे आवश्यक आहे.

११) द्रवनत्र वहातुकीचे वेळी वाहतुक मार्गात उपकेंद्राचे ठिकाणी वा द्रवनत्र भरुन घेण्याचे ठिकाणी घाई न करणारे व सभ्य वागणूकीचेच वाहन चालक व इतर मदतनीस असतील याची खबरदारी वाहन ठेकेदाराना घ्यावी लागेल.

१२) यशस्वी निविदा धारकास निवीदा मंजूर झाल्यापासून सात दिवासाचें आत वाहतुकीच्या कार्यकृतिची हमी पूर्ण करणेबाबत करारनामा नियमानुसार १०० रुपयाच्या स्टॅप पेपरवर लिहून द्यावा लागेल त्या शिवाय वहातुक ठेका मंजूर केला जाणार नाही.

१३) ठेकेदाराने ठेका स्विकारुन काम सुरु झाल्यावर नियमाप्रमाणे काम पार पाडण्याचे नाकारले तर त्याची भरलेली अनामत रक्कम जप्त करण्यात येईल. तसेच नविन ठेका मंजूर करताना जास्त दर मंजूर करावा लागला तर पूर्ण ठेक्याच्या रक्कमेतील फरक मूळ ठेकेदाराच्या सुरक्षा ठेवीतून व स्थावर जंगम मालमत्तेतून वसूल करण्यात येईल.

१४) मंजुर निवीदाधारक व्यतिरीक्त इतरांची बयाणा रक्कम एक महिनेचे आत परत करण्यात येईल.

१५) भारत सरकार आयकर विभाग यांच्या नियमाप्रमाणे भावबंध कराराप्रमाणे प्राप्त होणा-या रकमेवर नियमाप्रमाणे लागू असलेला अधिभारासह आयकर ठेकेदारास देय असलेल्या रकमेतून परस्पर कापून या कार्यालयातर्फे सरकारजमा करण्यात येईल याशिवाय शासनाने वेळोवेळी निर्गमित होणा-यासूचनेप्रमाणे आपणांस लागू असलेल्या कराच्या रकमेची कपात देयकातून वसूल केली जाईल.

१६) नियमानुसार देय पथकर (टोल) ठेकेदारास द्यावा लागेल.

१७) वाहतूकीचे वेळी वाहनाचे कि.मी. रिडींग सुरु असणे आवश्यक आहे.वाहतुकीची देयके ३० दिवसातून एकदाच स्विकारली जातील. वाहतुक ठेकेदाराने वाहतुकीची देयके वेळीच सादर करावीत. **सदर देयके जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त,जळगांव, जिल्हा जळगांव कार्यालयातर्फे शासकीय निधी च्या अधीन राहुन अदा केली जातील. तथापि काही प्रशासकिय कारणामूळे देयके पारीत होण्यास विलंब झाल्यास वाहतूक बंद करता येणार नाही.**

१८) वाहतुक करीत असताना अचानक गाडीस बिघाड झाल्यास गाडीची दुरुस्ती ठेकेदारास स्वखर्चाने त्वरीत करावी लागेल . प्रवासात सदर वाहनवेळेत दुरुस्ती न झाल्यास व दुसरे वाहनाची आवश्यकता वाटल्यास दुसरे वाहन भाडयाने घ्यावे लागले तर त्याचे पुर्ण भाडे ठेकेदारास द्यावे लागेल.

१९) निविदेत ठरलेले वाहन ठरलेल्या वेळेवर कामाकरिता व ठरवलेल्या वाहतुकीसाठी वाहातुकदारास काही कारणामूळे उपलब्ध करुन देता आले नाही तर अपरिहार्य परिस्थितीत दुसरे वाहन या कार्यालयासाठी उपलब्ध करुन द्यावे लागेल. (पर्यायी व्यवस्था म्हणून) त्याकरीता जास्त आकार पडला तर तो स्वतः ठेकेदारास भरावा लागेल. ठेकेदाराच्या हलगर्जीपणामुळे वाहन उपलब्ध न झाल्यास कार्यालय बाजारातील दुसरे वाहन उपलब्ध दराने मिळवेल व त्यासाठी द्यावे लागणारे जास्तीचे भाडे ठेकेदाराच्या देयकातून वसूल करण्यात येईल.

२०) वाहतूक करीत असताना ठेकेदार अथवा प्रतिनिधीकडून कोणत्याही प्रकारचा वाहन परिवहन विषयक किंवा पोलीस कायदा विषयक नियमाचे उल्लंघन झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी ठेकेदारावर राहील व वाहन जप्त व इतर कार्यवाहीसाठी खोळंबून ठेवल्यास द्रवनत्र पात्रांच्या वहातुकीसाठी दुसरे पर्यायी वाहन उपलब्ध करुन देवून त्यामधून द्रवनत्रपात्राची वाहतुक जबाबदारीने करुन द्यावी लागेल.

२१) एकाच वेळी एकापेक्षा जास्त वाहने शासकीय कामासाठी आवश्यक असल्यास अन्य सुस्थितीतील परिवहन नियम योग्य वाहने उपलब्ध करुन द्यावी लागतील ही वाहने अशावेळी मुख्य ठेकेदाराव्यतिरिक्त दुस-याचे असू शकतील मात्र वाहतुकीची संपूर्ण जबाबदारी ठेकेदाराचीच राहील व वहातुकीचे दर भावबंधीत करारात निश्चित केल्याप्रमाणेच प्रति कि.मी.या दराने दयावे लागतील.

२२) संबंधित वाहनात इंधन, ऑईल, ग्रीस इत्यादि वाहतुक ठेकेदारास स्वखर्चाने करावा लागेल व काही कारणाने इंधनाचा भाव वाढल्यास संबंधीत कार्यालय भाववाढ देणार नाही.

२३) वाहतुक करीत असताना शासकिय कामास्तव केंद्रावर किंवा कार्यालयात मुक्कामाच्या कालावधीकरिता कोणताही वेगळा आकार देण्यात येणार नाही. शासकिय प्रतिनिधीला कामाचे स्वरुपानुसार त्या कार्यालयात/केंद्रावर थांबता येईल व तोपर्यत वाहन तेथे ठेवावे लागेल.

२४) या कार्यालयाकरीता नेमलेले वाहनच वाहतुकीसाठी उपलब्ध करुन द्यावे लागेल व काही कारणाने ठेकेदाराने अन्य वाहन उपलब्ध करुन दिले तरी भावबंद करारानुसार असलेलाच प्रति कि.मी. दर मिळेल.

२५) वहातुक करीत असताना संबंधित वाहनात ठेकेदाराच्या अधिकृत दोन प्रतिनिधीशिवाय इतर कोणतेही प्रवासी/सामान घेवू नये तसे आढळल्यास कमीत कमी रु. १००/- व जास्तीत जास्त रु. १०००/- दंड आकारण्यात येईल.

२६) गाडीचा वेग दर ताशी ४० कि.मी पेक्षा जास्त ठेवता येणार नाही. तसेच मद्यपान इत्यादि करुन चालक आढळल्यास व गाडीच्या वेग मर्यादेचे उल्लंघन आढळल्यास त्यास रु. १००/- ते रु. १०००/- पर्यंत दंड आकारण्यात येईल व मद्यपानाबाबत कायदेशीर कार्यवाहीस सामोरे जावे लागेल. त्यामूळे शासकीय संपत्तीचे नुकसान झाल्यास ते ठेकेदाराने भरुन द्यावे लागेल.

२७) हेच वाहन पशुसंवर्धन खात्याच्या इतर संस्थांच्या योजनांतर्गत व वाहतुकीकरिता लागल्यास उपलब्ध करुन द्यावे लागेल.

२८) वाहनामध्ये वाहतूकीच्यावेळी आवश्यक्ता असल्यास खात्याचे अतिरिक्त प्रतिनिधी वाहनासोबत जावू शकतील.

२९) जिल्हांतर्गत द्रवनत्र वाहतूक करताना जिल्हयातील प्रत्येक केंद्रावर पशुधन विकास अधिकारी, जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र, जळगांव, जिल्हा जळगांव यांचे आदेशानुसार ठरवून दिलेल्या मार्गांनेच वाहतुक करण्याचे बंधन ठेकेदारावर राहील.

३०) या संबंधित उद्‌भवणा-या तक्रारीचे निराकरण करण्याचे अंतिम अधिकार जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त जळगांव, जिल्हा जळगांव यांना राहतील.

३१) संबंधित वाहनासोबत वाहनाची कागदपत्रे ठेवणे बंधनकारक राहील.

३२) तसेच वाहनावर महाराष्ट्र शासनाच्या सेवेत असा फलक फक्त या कार्यालयाचे कामकाज करतानांच लावणेचा आहे.

३३) जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, जळगांव, जिल्हा जळगांव यांना ठेकेदाराचे काम समाधानकारक न आढळल्यास ते बंद करण्याचे व तत्सम दुसरी कार्यवाही करण्याचे अधिकार राहतील. अशावेळी सुरक्षित ठेव अनामत रक्कम जप्त करुन ठेकेदारावर कार्यवाही करण्यात येईल.

३४) पशुधन विकास अधिकारी, जिल्हा कृत्रिम रेतन जळगांव, जिल्हा जळगांव यांनी वेळोवेळी केलेल्या सुचना व अटींमध्ये वेळोवेळी केलेला बदल ठेकेदारास मान्य करावा लागेल.

३५) द्रवनत्र वाहतुकीच्या कालावधीत जर खात्याने वाहतुकीची पर्यायी व्यवस्था केली तर वाहतुक करार केंव्हाही रद्द केला जाईल.

३६) कंत्राटधारकास कोणतीही अट किंवा पर्याय देता येणार नाही उपकंत्राटक देता येणार नाही.तसेच एकापेक्षा अधीक दर नमुद करता येणार नाही असे झाल्यास दरपत्रक विचारात घेतली जाणार नाही.

३७) निवड प्रक्रियेत तीन पेक्षा कमी ग्राहय दरपत्रक प्राप्त झाल्यास अथवा अल्प प्रतीसादामुळे दरपत्रक सुचनेस पुन्हा मुदत वाढ देण्यात येईल.

३८) **संपूर्ण ई निविदा स्विकारणे,मंजूर करणे, रद्द करणे व इतर कोणतेही कारण न दाखविता मान्य न करणे वगैरे सर्व बाबतीत अधिकार समितीकडे राहतील व समितीचा निर्णय ठेकेदारास बंधनकारक राहील.सदर दरपत्रकांबाबत कोणताही वाद उद्‌भवल्यास अथवा न्यायालयीन प्रकरण (कोर्ट मॅटर) झाल्यास जळगांव येथील न्यायालयातच अपील करणे बंधनकारक राहील.**

**जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय**

जळगांव

वरील सर्व १ ते ३८ अटी व शर्ती मी वाचल्या असून, त्या सर्व मला मान्य व बंधनकारक आहेत

वाहतुक कंत्राटदाराची सही
संपूर्ण नाव-
पुर्ण पत्ता- संपर्क क्रमांक

**द्रवनत्र वाहतूकसाठी केंद्रनिहाय ११ रुटचा तक्ता**

| अ.क्र | मार्ग | कि मी, | अ.क्र | मार्ग | कि मी |
|---|---|---|---|---|---|
| १ | भोकर मार्ग | १८५ | ७ | यावल मार्ग | १९७ |
| २ | चाळीसगांव मार्ग | ४०३ | ८ | मुक्ताईनगर मार्ग- | ३०७ |
| ३ | एरंडोल मार्ग | ३०५ | ९ | रावेर मार्ग | २५६ |
| ४ | पाचोरा मार्ग | २६४ | १० | चोपडा मार्ग | ३०३ |
| ५ | पारोळा मार्ग | २५१ | ११ | अमळनेर मार्ग | २४६ |
| ६ | जामनेर मार्ग | २५६ | | | |

जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय
जळगांव

# दरपत्रक

(व्यापारी प्रपत्र)

| अ क्र | वाहनाचा तपशील | प्रति किलोमीटर दर अंकी रुपये (सर्व करांसहित) | प्रति किलोमीटर दर अक्षरी रुपये (सर्व करांसहित) |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | वाहनाचा क्रमांक- | | |
| २ | मेक- | | |
| ३ | आर.टी.ओ.पासींग- | | |
| ४ | खरेदी वर्ष-<br>(प्रथम नोंदणी १५ वर्षाच्या आतील) | | |

वाहतूकीच्या अटी व शर्ती मी वाचल्या असून त्या सर्व मला मान्य आहेत.

दिनांक:

सही/-

ठिकाण

निवीदा धारकाचे संपूर्ण नाव-

पत्ता-(दुरध्वनी क्रमांकासह)

# दरपत्रक

(व्यापारी प्रपत्र)

| अ क्र | वाहनाचा तपशील | प्रति किलोमीटर दर अंकी रुपये (सर्व करांसहित) | प्रति किलोमीटर दर अक्षरी रुपये (सर्व करांसहित) |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | वाहनाचा क्रमांक- | | |
| २ | मेक- | | |
| ३ | आर.टी.ओ.पासींग- | | |
| ४ | खरेदी वर्ष- **(प्रथम नोंदणी १५ वर्षाच्या आतील)** | | |

वाहतूकीच्या अटी व शर्ती मी वाचल्या असून त्या सर्व मला मान्य आहेत.

दिनांक:

सही/-

ठिकाण

निवीदा धारकाचे संपूर्ण नाव-

पत्ता-(दुरध्वनी क्रमांकासह)

# दरपत्रक धारकाचे संमतीपत्र

विषय- महाराष्ट्रातुन व महाराष्ट्राबाहेरील राज्यातील कुठल्याही ठिकाणाहुन दि.१-७-२०२६ ते दि. ३०-६-२०२७ या कालावधीकरीता द्रवनत्र पात्रामधुन द्रवनत्र भरुन आणुन जळगांव जिल्हयातील १८२ कृत्रिम रेतन उपकेंद्राना पुरवठया करीता तसेच गरजेनुसार सांगतील त्या वाहुकीसाठी दरकरार

संदर्भ- दरपत्रक नोटीस क्र. जिपउआ/तांत्रिक/वाहतुक दरकरार/    /२०२६, जळगांव
दि.  /  /२०२६

१. वाहतुक  नमुद अटी व शर्ती मला मान्य असुन त्या माझ्यावर बंधकारक आहेत.
२. दरकरारसाठी सर्व अटी व शर्ती मी वाचुन समजुन घेतल्या आहेत.
३. दरकरारसाठी नमुद केलेले दर सर्व करासहीत आहेत.
४. माझे  वाहनाचे दर  स्विकृत झाल्यास रक्कम (३ टक्के) रु.२५०००/- मात्र अनामत रक्क म म्हणुन जिल्हा पशुसवंर्धन उपायुक्त जळगांव यांच्या नावाने रोखीत  दर्शनी हुंडी (डिपॉझीट ॲट कॉल रिसीट) स्वरुपात तात्काळ भरण्यास मी तयार आहे
५. सुचनेतील नमुद काम अटी व शर्तीनुसार न चुक ता करण्याची मी हमी देत आहे कामात काही अडचण विलंब, नुकसान झाल्यास जबाबदारी माझी राहील. त्याबाबत वसुली माझे बयाणा रक्कम/सुरक्षा अनामत रक्कम मधुन करण्यास माझी काहीही हरकत नाही.

कंत्राटदाराची सही

संपुर्ण पत्ता मोबाईल नंबरसह

# दरपत्रक धारकाचे संमतीपत्र

विषय- महाराष्ट्रातुन व महाराष्ट्राबाहेरील राज्यातील कुठल्याही ठिकाणाहुन दि.१-७-२०२६ ते दि. ३०-६-२०२७ या कालावधीकरीता द्रवनत्र पात्रामधुन द्रवनत्र भरुन आणुन जळगांव जिल्हयातील १८२ कृत्रिम रेतन उपकेंद्राना पुरवठया करीता तसेच गरजेनुसार सांगतील त्या वाहुकीसाठी दरकरार

संदर्भ- दरपत्रक नोटीस क्र. जिपउआ/तांत्रिक/वाहतुक दरकरार/ /२०२६, जळगांव
दि. / /२०२६

१. वाहतुक नमुद अटी व शर्ती मला मान्य असुन त्या माझ्यावर बंधकारक आहेत.
२. दरकरारसाठी सर्व अटी व शर्ती मी वाचुन समजुन घेतल्या आहेत.
३. दरकरारसाठी नमुद केलेले दर सर्व करासहीत आहेत.
४. माझे वाहनाचे दर स्विकृत झाल्यास रक्कम (३ टक्के) रु.२५०००/- मात्र अनामत रक्कम म्हणुन जिल्हा पशुसवंर्धन उपायुक्त जळगांव यांच्या नावाने रोखीत दर्शनी हुंडी (डिपॉझीट ॲट कॉल रिसीट) स्वरुपात तात्काळ भरण्यास मी तयार आहे
५. सुचनेतील नमुद काम अटी व शर्तीनुसार न चुक ता करण्याची मी हमी देत आहे कामात काही अडचण विलंब, नुकसान झाल्यास जबाबदारी माझी राहील. त्याबाबत वसुली माझे बयाणा रक्कम/सुरक्षा अनामत रक्कम मधुन करण्यास माझी काहीही हरकत नाही.

कंत्राटदाराची सही

संपुर्ण पत्ता मोबाईल नंबरसह

## परिशिष्ट-अ

### कंत्राटदाराने सादर करावयाच्या बाबींची यादी.

| अ.क्र. | तपशील | शेरा | पृष्ठ क्रमांक. |
|---|---|---|---|
| 1 | अटी व शर्ती मान्य असल्याचे पीडीएफ फॉरमॅट मध्ये कंत्राटदाराचे नमुन्यातील संमतीपत्र | | |
| 2 | वाहनाचा विमा भरला असल्याची कागदपत्रांच्या सांक्षाकिंत प्रती. | | |
| 3 | वाहनकर पुस्तिका,पंजीकृत नोंदणी पुस्तिका (रजिस्ट्रेशन बुक ) यांच्या सांक्षाकिंत प्रती,मालवाहतुक परवाना | | |
| 4 | पी.यु.सी प्रमाणपत्र. | | |
| 5 | पॅनकार्ड प्रत व स्वतः च्या बँक पासबुकची झेरॉक्स प्रत अकाउंट नंबर,बँक , कोड व आयएफसी कोड, पॅन कार्ड,आधार कार्ड प्रत | | |

वरीलप्रमाणे सर्व कागदपत्रे मी तपासुन जोडलेली आहेत व ती बरोबर आहेत.

दिनांकः-

सही/-

ठिकाणः-

कंत्राटदाराचे संपूर्ण नाव-